# महाराष्ट्र वस्तु व सेवाकर विभाग

राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,

८ वा मजला, नवीन इमारत, वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई - ४०० ०१०.

## कार्यालयीन आदेश

क्र. राज्यकर आयुक्त / आस्था-३ / पुनर्रचना कक्ष / अतिरिक्त राज्यकर निरीक्षक / धा. क्र. १२६ मुंबई दि. 09 NOV 2023

**विषय : राज्यकर निरीक्षक उपलब्ध करून देणे बाबत.**

प्रस्तावना :

उपरोक्त विषयास अनुसरून असे सादर करण्यात येते कि प्रपत्र-अ च्या मंजूर पदांच्या तक्त्या वरून नोडल -१ व २ व नोडल-३ व ४ मुंबई या विभागात मंजूर असलेल्या अधिकाऱ्यांच्या पदसंख्येच्या तुलनेत राज्यकर निरीक्षक यांची संख्या कमी आहे तसेच नोडल-९ , नोडल-१० आणि नोडल-११ यांच्या कडे अधिकाऱ्यांच्या पद संख्येच्या तुलनेत मंजूर राज्यकर निरीक्षकांची संख्या अधिक असल्याचे दिसून येते.

खालील तक्त्या नुसार नोडल-९ विभागातून ६५अतिरिक्त राज्यकर निरीक्षक , नोडल-१० विभागाकडून ४५ अतिरिक्त राज्यकर निरीक्षक आणि नोडल-११ विभागाकडून १० अतिरिक्त राज्यकर निरीक्षक हे कमी करून नोडल-१ व २ या विभागाकडे प्रत्येकी २५ आणि नोडल-३ व ४ या विभागाकडे प्रत्येकी ३५ राज्यकर निरीक्षक उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सदर राज्यकर निरीक्षक पदे ज्या कार्यालयातून स्थानांतरित करण्यात येत आहे ते कार्यालय

| अ.क्र. | कार्यालय | राज्यकर निरीक्षक | कमी करण्यात आलेले राज्यकर निरीक्षक | एकूण राज्यकर निरीक्षक |
|---|---|---|---|---|
| १ | नोडल-९ | १६३ | ६५ | ९८ |
| २ | नोडल-१० | १३३ | ४५ | ८८ |
| ३ | नोडल-११ | १०७ | १० | ९७ |

सदर राज्यकर निरीक्षक पदे ज्या कार्यालयात स्थानांतरित करण्यात येत आहे ते कार्यालय

| अ.क्र. | कार्यालय | राज्यकर निरीक्षक | अतिरिक्त देण्यात आलेले राज्यकर निरीक्षक | एकूण राज्यकर निरीक्षक |
|---|---|---|---|---|
| १ | नोडल-१ व २ | ९८ | ५० | १४८ |
| २ | नोडल-३ व ४ | ८४ | ७० | १५४ |

उपरोक्त बदल हे सदर आदेशाच्या दिनांकापासून अंमलात येतील. स्थानांतरामुळे मुंबई येथील नोडल-१ व २ ,नोडल-३ व ४ तसेच नोडल-९ , नोडल-१० आणि नोडल-११ या कार्यालयातील प्रपत्रे बदलण्यात येतील.

सदर बदला नंतर पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

१.ज्या विभागातून पदें स्थानांतरीत होतील व ज्या विभागामध्ये पदे अंतर्भूत होतील त्या संबंधित विभागांचे सुधारित प्रपत्र-'अ' (मुख्य कर विषयक संवर्गातील पदांचे कार्यालयनिहाय व संवर्गनिहाय पदवाटप), प्रपत्र-'ब' (मुख्य करविषयक संवर्गातील पदांची व इतर संवर्गातील पदांची पदनामे व महाविकास संकेतांक) निर्गमित करणे व सुधारित प्रपत्र-'क' (आहरण व संविरण व संविरण निहाय पदवाटप तक्ते) निर्गमित करणे.

२.अंतर्गत समायोजनेद्वारे ज्या विभागातून पदे स्थानांतरीत होतील व ज्या विभागामध्ये पदे अंतर्भूत होतील त्या त्या विभा-गांच्या सेवार्थ प्रणालीत आहरण व संवितरण निहाय पदांची घट/ वाढ करण्याचा प्रस्ताव शासनास पाठवणे.

३.उपरोक्त नमुद पदांच्या स्थानांतरणांची प्रक्रिया सुलभतेने पार पाडण्याच्या दृष्टीने राज्यकर सहआयुक्त (महाविकास), मुंबई यांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

अ) सुधारित महाविकास संकेतांकांचे प्रपत्र-'ब' निर्गमित झाल्यानंतर नवीन महाविकास सांकेतांक प्रणालीवर अंतर्भूत करणे व जे महाविकास सांकेतांक पदांच्या स्थानांतरणामुळे रद्द होत आहेत ते गोठवणे (Freeze).

ब ) नोडल-९ विभागातून ६५ तसेच नोडल-१० विभागातून ४५ व नोडल-११ विभागातून १० अतिरिक्त राज्यकर निरीक्षक कमी करून त्यांचे नवीन महाविकास सांकेतांक नोडल-१ व २ आणि नोडल-३ व ४ या विभागाकडे जोडणे.

४. वर नमूद केल्याप्रमाणे नोडल-९ विभागातून ६५ , नोडल-१० विभागातून ४५ आणि नोडल-११ विभागातून १० राज्यकर निरीक्षक कमी करून नोडल-१ व २ तसेच नोडल-३ व ४ यांच्या कडे अतिरिक्त राज्यकर निरीक्षक उपलब्ध करून देण्याचे आदेश मा. आयुक्तांना शासन निर्णय वित्त विभाग क्र./विकवि1219/प्र.क्र.02/वि.प्र.4 दि. 25/02/2020 अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

(राजीवकुमार मितल)
**भा.प्र.से.**
राज्यकर आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत:

१. विशेष राज्यकर आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई.
२. मुख्य दक्षता अधिकारी, मुंबई
३. सर्व अपर राज्यकर आयुक्त
४. सर्व राज्यकर सहआयुक्त
५. राज्यकर आयुक्तांचे विशेष कार्य अधिकारी व स्टाफ ऑफिसर
६. सर्व आस्थापना अधिकारी
७. निवडनस्ती
८. स्थळ प्रत.